**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 08-04-2025**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कामठी ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-04-08 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-04-09 | 2025-04-10 | 2025-04-11 | 2025-04-12 | 2025-04-13 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0.5 |
| कमाल तापमान (अं.से) | 41.7 | 41.1 | 42.4 | 41.9 | 41.2 |
| किमान तापमान (अं.से) | 28.9 | 30 | 30.2 | 30.9 | 29.7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 31.1 | 41 | 26.4 | 23.6 | 28.8 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 10.2 | 14.6 | 9.6 | 7 | 10.1 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6.9 | 11.9 | 11.6 | 8.7 | 13.4 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 186 | 183.4 | 185.3 | 150.3 | 323.8 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 0 | 3 | 3 | 3 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील ५ दिवस दिनांक ०९ ते १३ मार्च २०२५ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहील, • दिनांक ९, १०, ११, १२ आणि १३ एप्रिल २०२५ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील ३ दिवसांत कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही त्यानंतर हळूहळू २ अंश सेल्सिअस ने घट होईल.

## कृषि सल्ला:

• पुढील ७२ तासानंतर संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील हरभरा, गहू, जवस, मोहरी तसेच इतर रब्बी हंगामातील पिकाची कापणी व मळणी ची कामे लवकरात लवकर उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. कापणी केलेला शेतमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. मळणी ची कामे शक्य नसल्यास कापणी केलेला शेतमाल प्लास्टीक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकरी बांधवाद्वारा विक्री साठी आणलेल्या शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतमाल हा उघड्यावर साठवणे टाळावे, शेतमाल हा शेड मध्येच साठवावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकरी बांधवाद्वारा विक्री साठी आणलेल्या शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतमाल हा उघड्यावर साठवणे टाळावे.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | • उन्हाळी भुईमुग पिकास दर ८ ते १० दिवसाच्या अंतराने दोन ओळी आड ओलीत करावे. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | • कांदा पिकाला लागवडीनंतर जमिनीतील ओलाव्यानुसार ७-१० दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. • रोग आणि कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक असल्यास कार्बोसल्फान (२ मिली/लीटर) आणि ट्रायसायक्लॅझोल (१ ग्रॅम/लीटर) ची पहिली फवारणी करावी. • आवश्यक असल्यास, पहिल्या फवारणीच्या १५ दिवसांनी प्रोफेनोफॉस (१ मिली/लीटर) आणि हेक्साकोनाझोल (१ ग्रॅम/लीटर) ची दुसरी फवारणी करावी. • आवश्यक असल्यास, दुसऱ्या फवारणीच्या १५ दिवसांनी फिप्रोनिल (१ मिली/लीटर) आणि प्रोपिकोनाझोल (१ ग्रॅम/लीटर) ची तिसरी फवारणी करावी. • लागवडीनंतर ४५, ६० आणि ७५ दिवसांनी सूक्ष्म पोषक मिश्रण (५ ग्रॅम/लीटर) पानांवर फवारणी करावी. |
| लसूण | • लसून पिकास कमी पण नियमित पाणी आवश्यक आहे. उगवण झाल्यानंतर ८ ते १० दिवसाच्या अंतराने पिकाच्या गरजेनुसार जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्या. साधारणपणे १२ ते १५ पाण्याच्या पाळ्या लागतात. • रोग आणि कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक असल्यास कार्बोसल्फान (२ मिली/लिटर) आणि ट्रायसायक्लॅझोल (१ ग्रॅम/लिटर) ची पहिली प्रतिबंधात्मक फवारणी करावी. • आवश्यक असल्यास, पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी प्रोफेनोफॉस (१ मिली/लिटर) आणि हेक्साकोनाझोल (१ ग्रॅम/लिटर) ची दुसरी फवारणी करावी. • जर पहिल्या दोन फवारण्या संपल्या असतील, तर आवश्यक असल्यास, दुसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांनी फिप्रोनिल (१ मिली/लिटर) आणि प्रोपिकोनाझोल (१ ग्रॅम/लिटर) ची तिसरी फवारणी करावी. • जर लाल कोळी किडीचा प्रादुर्भाव आढळला तर, एलिमेंटल सल्फर (२ ग्रॅम/लिटर) किंवा डायकोफोल (२ मिली/लिटर) या प्रमाणात फवारणी करावी. |
| आंबा | • पाऊस व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी. |
| टरबूज | • पाऊस व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी. • कलिंगड सिंचनाला चांगला प्रतिसाद देते म्हणून नियमित अंतराने ओलीत करावे. पिकास वारंवार जास्त पाणी देऊ नये त्यामुळे वनस्पतींची वाढ जास्त होते. फळे काढणीस आल्यानंतर पाणी देणे थांबवावे कारण त्यामुळे फळांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो आणि फळे फुटतात. पिकामध्ये पाणी साचू देऊ नका. फुलधारणेपूर्वी, फुले येण्याच्या आणि फळांच्या विकासाच्या अवस्थेमध्ये पाण्याचा ताण बसणार नाही दक्षता घ्यावी. फक्त मुळांच्या भागात पाणी द्यावे आणि ओलीत करताना वनस्पतींच्या विविध भागास, फुले आणि फळे ओली होणार नाही याची काळजी घ्यावी. • वनस्पतीजन्य वाढ रोखण्यासाठी आणि मादी-नर फुलांचे प्रमाण वाढविण्यासाठी जास्त वाढ झालेल्या वेलीची हाताने छाटणी करावी. जर शेंडा खुडला आणि बाजूच्या २-४ कोंबांना वाढू द्यावे असे केल्यास उत्पादन वाढीस मदत होते. फळांचा आकार आणि उत्पादन सुधारण्यासाठी प्रत्येक वेलात जास्तीत जास्त ४-५ फळे टिकवून ठेवण्यासाठी फळांची विरळणी करावी. |
| संत्रा | • पाऊस व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता झाडांना बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी. • आंबिया बहरातील फळधारणा टिकवून ठेवण्यासाठी ओलीत चालू ठेवावे. उन्हाळा आणि उच्च तापमानामुळे सिंचनाची वारंवारता 6-7 दिवसांच्या अंतराने ठेवावी. नागपूर संत्रा आणि मोसंबीच्या एक वर्षाच्या झाडाला दुप्पट आणि 3 वर्षांच्या झाडाला तिप्पट पाणी द्यावे. ८ वर्षांच्या झाडाला १६३ लिटर पाणी/दिवस/झाड द्यावे तर १० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या झाडाला २०४ लिटर पाणी/दिवस/झाड द्यावे. लिंबाच्या एक वर्षाच्या झाडाला ११ लिटर पाणी/दिवस/झाड द्यावे, २ वर्षांच्या झाडाला १६ लिटर पाणी/दिवस/झाड द्यावे, ८ वर्षांच्या झाडाला ६५ लिटर पाणी/दिवस/झाड द्यावे तर १० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या झाडाला १०० लिटर पाणी द्यावे. • उन्हाळ्याच्या महिन्यांत झाडाच्या बुंध्याभोवती ५-१० सेंटीमीटरपर्यंत गव्हाचे पेंढा, भाताचे पेंढा किंवा उपटलेल्या तणांनी आच्छादन करावे जेणेकरून उच्च तापमानामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी करता येईल ज्यामुळे बाष्पीभवन पीक कमी होण्यास मदत होईल. • एक वर्षाच्या झाडासाठी १०८ ग्रॅम युरिया किंवा २५० ग्रॅम अमोनियम सल्फेट आणि १५७ ग्रॅम सिंगल सुपरफॉस्फेट तसेच २५ ग्रॅम झिंक सल्फेट, २५ ग्रॅम फेरस सल्फेट आणि २५ ग्रॅम मॅंगनीज सल्फेट या प्रमाणात खत द्यावे. २, ३ आणि ४ वर्षांच्या झाडांसाठी हे प्रमाण एका वर्षाच्या झाडासाठी शिफारस केलेल्या प्रमाणाच्या दुप्पट, तीन आणि चार पट असावे. जमिनीत प्रत्येक झाडाला २० ते २५ किलो शेणखत द्यावे. ही खते आणि शेणखत झाडांच्या परिघामध्ये टाकावे आणि काळजी घ्यावी की खते फक्त ओलसर जमिनीतच टाकावीत. • या महिन्यात कोळी किडीचा प्रादुर्भाव धोकादायक बनतो. या किडीचा नियंत्रण करण्यासाठी, डायकोफोल १.८ ईसी @ २ मिली किंवा प्रोपार्जाइट १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करता येते. १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी करा. • लिंबूवर्गीय पिठ्या ढेकुण किडीच्या नियंत्रणासाठी, मुंग्यांची घरटी नष्ट करावी आणि क्लोरपायरीफॉस २० ईसी @ २ मिली / लिटर पाण्यात किंवा डायक्लोरोव्होस @ २.५ मिली / लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या पानांवर आणि खोडावर फवारणी करा. • लिंबूवर्गीय झाडांवरील मृत फांद्या छाटून घ्याव्या, मृत भागाच्या सुमारे २ सेमी खाली ठेवावे आणि त्यानंतर कार्बेंडाझिम बुरशीनाशक प्रति लिटर पाण्यात एक ग्रॅम या प्रमाणे फवारणी करावी. • आंबिया बहारातील फळ गळ टाळण्यासाठी, |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | १०० लिटर पाण्यात १.५ ग्रॅम २ ४ - डी किंवा जिबरेलिक अॅसिड १०० ग्रॅम बेनोमील आणि १ किलो युरिया मिसळून १०० लिटर पाण्यात विरघळवून फवारणी करावी. जर जास्त फळ गळती होत राहिली तर १५ दिवसाच्या अंतराने पुन्हा फवारणी करावी. ओलिताचे नियमित निरीक्षण करावे. • रोपवाटिकांसाठी, १.५ फूट उंचीपर्यंत उंच असलेल्या काँक्रीटच्या पृष्ठभागावर एक भाग सुपीक माती, एक भाग वाळू आणि एक भाग शेणखत पसरवून माती तयार करावी. अशा प्रकारे तयार झालेला बेड पूर्णपणे पाण्याने भिजवा आणि १०० मायक्रॉन जाडीच्या पॉलिथिन शीटने झाकून टाका. बाष्पीभवन टाळण्यासाठी पॉलिथिन शीटच्या बाजू बंद कराव्यात. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • उन्हाळी चारा उपलब्धतेसाठी ज्वारी, मका व बाजरी या पिकाची लागवड करावी. यासाठी ज्वारीच्या रुचिरा, एसएसजी- ५९-३, मालदांडी ३५-१, पुसा चारी व अमृता, मक्याच्या आफ्रिकन टोल, मांजरी कंपोजीट, विजय व गंगा सफेद-२ व बाजरीच्या जायंट बाजार, के ६७४, ६७७ राजको, बाजरा, न्यूट्रीफीड या वाणाची लागवड करावी. ज्वारी, मका व बाजरी या पिकाची चारा उपलब्धतेसाठी मार्च-एप्रिल महिन्यात लागवड करावी. ज्वारी, मका व बाजरी ची पेरणी पाभरीच्या सहाय्याने दोन ओळीतील अंतर ३० सेंमी एवढे ठेऊन करावी. • दुग्धउत्पादन वाढविण्यासाठी दुधाळ गाय/म्हशी यांना हवे त्या वेळी पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची उपलब्धता त्याच्यासमोर करावी. पाण्याचा हौद नेहमी स्वच्छ ठेवावा, त्यास चुना लावावा. पाण्याचे हौद नेहमी सावलीत, पाण्यात पक्षांची विष्ठा पडणार नाही अशा ठिकाणी हौद ठेवावे. • गोठ्याच्या दुरुस्तीची कामे प्राधान्याने पुढील २ दिवसामध्ये करून घ्यावी. • मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. |